शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणी ५ गंभीर आजारांमध्ये सर्व प्रकारच्या कर्करोगांचा समावेश करणे व पाच गंभीर आजारावरील खर्च भागवण्यासाठी रुपये १,००,००० एवढया अग्रीमाची मर्यादा रुपये १,५०,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांक एमएजी- २००५/ प्र.क्र.२५१/आ.३
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० फेब्रुवारी २००६.

**वाचा** १) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०८४/ ४९५७/सीआर-१५६/ दिनांक २१.४.१९८५
२) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०८८/३८३७/आ.९, दिनां २३.१.१९८९
३) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०९९/प्र.क्र.२३८/आ.३, दि.२१.८.१९९९
४) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०९५/ सीआर-४५/आ.३, दि.४.७.२०००
५) शासन निर्णय सा.आ.बि.क्र.एमएजी-१०९५/ सीआर-४५/आ.३, दि.४.७.२०००
६) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-२००५/ १/ प्र.क्र.१/ आ.३, दि.१९.३.२००५

**शासन निर्णय :** संदर्भाधिन क्र.४ येथे नमूद करण्यात आलेल्या दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयान्वये खाली नमूद केलेले पाच गंभीर आजार अंतर्भूत आहेत ;

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया
५) रक्ताचा कर्करोग

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
AB
आवक
21 MAR 2006

वरील गंभीर आजारांमध्ये अंतर्भूत रक्ताच्या कर्करोगाशिवाय, इतर सर्व प्रकारच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण, आजारातील गांभीर्य व उपचारावर उद्भवणारा खर्च यासर्व बाबी लक्षात घेऊन, अ.क्र. ५ येथील "रक्तीचा कर्करोग" या ऐवजी "कर्करोग" असा बदल करण्याची बाब विचाराधीन होती. यास अनुसरून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

अ) प्रस्तुत दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयातील विर्निदिष्ट ५ गंभीर आजारांच्या यादीतील अ.क्र. ५ येथील "रक्ताचा कर्करोग" या ऐवजी **"कर्करोग"** अशी सुधारणा करण्यात येत आहे आणि या आजारावर शासकीय अथवा शासनमान्य खाजगी

रुग्णालयातील आंतररुग्ण तसेच बाह्यरुग्ण उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

ब) प्रस्तुत दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयान्वये व त्यासोबत "अ" मधील सुधारणांसह पाच गंभीर आजारांवरील शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रुग्णालयातील औषधोपचार व आवश्यक उपकरणांची खरेदी करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन प्रचलित रु.१,००,०००/- अग्रिमाची मर्यादा मध्ये १,५०,०००/- ( रु. एक लाख पन्नास हजार फक्त) एवढी वाढविण्यात येत आहे.

क) अग्रिम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णय दि.४.७.२००० सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणेच राहतील.

३. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणांना अथवा आदेशाच्या दिनांकास औषधोपचार सुरु असणाऱ्या प्रकरणांना देखील हे आदेश लागू राहातील. मात्र या आदेशाच्या दिनांकापूर्वी निर्णयीत झालेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यात येऊ नयेत.

४. सदर आदेश महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, राज्यपाल कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२/ सेवा-५, दिनांक १९ जानेवारी, २००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( र.मा.आग्डे )
कार्यासन अधिकारी.

प्रति.